# माहिती अधिकार कलम ४ (१) प्रमाणे

## पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची तासगांव जिल्हा सांगली कार्यालयातील रचना,कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील.

**१)** महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हयातील नवप्रविष्ठ पोलीस अंमलदार प्रशिक्षणार्थी यांना मुलभूत प्रशिक्षण देणाऱ्या तुरची पोलीस प्रशिक्षण केंद्राची स्थापना ०४ जून २०१० मध्ये महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक टीईएक्स/०३०८/प्र.क्र/४४२/पोल-अ दि.०४.०६.२०१० नुसार करण्यात आलेली आहे. पोलीस प्रशिक्षण केंद्र तुरची हे सांगली जिल्हयामधील तासगांव शहराच्या वायव्य दिशेला १२ किलो मीटर अंतरावर आहे.

पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची मध्ये सुरुवातीस पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे अधिकाऱ्याचे प्रशिक्षण सत्रे पार पाडली. त्यानंतर पोलीस दलात पोलीस अंमलदार या पदावर भरती झालेल्या नवप्रविष्ठ पोलीस अंमलदार प्रशिक्षणार्थी मुलभूत प्रशिक्षण दिले जाते. याव्यतिरिक्त या ठिकाणी वेळोवेळी वेगवेगळे सेवातंर्गत प्रशिक्षण देखील आयोजित करण्यात येते. तसेच या व्यतिरिक्त गृह रक्षक दल, महाराष्ट्र सुरक्षा दल, वन विभाग, याच्यामधीलही नवप्रविष्ठ अंमलदार व अधिकारी यांचे माननीय वरिष्ठांच्या आदेशान्वये प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात येतात.

| अ.क्र. | पद | विभाग | प्रशिक्षण कालावधी |
|---|---|---|---|
| **०१** | पोलीस उप निरीक्षक (सरळसेवा) | पोलीस | १२ महिने |
| **०२** | पोलीस उपनिरीक्षक (खात्याअंतर्गत) | पोलीस | ०९ महिने |
| **०३** | नवप्रविष्ठ पोलीस अंमलदार | पोलीस | ०९ महिने |
| **०४** | गृह रक्षक | गृह रक्षक | ३५ दिवस |
| **०५** | वन विभाग | वन | ०२आठवडे |
| **०६** | सागरी सुरक्षा | पोलीस | ०३ महिने |
| **०७** | महाराष्ट्र सुरक्षा दल | सुरक्षा महामंडळ | ०२ महिने |
| **०८** | व्यावसायिक कौशल्य विकास प्रशिक्षण | पोलीस | १४ दिवस |

तुरची पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये आजपावेतो पोलीस उपनिरीक्षक (सरळ सेवा / खात्यातंर्गत) एकूण ०३ बॅचेस प्रशिक्षित करण्यात आलेले आहेत. तसेच महाराष्ट्र पोलीस दलामध्ये विविध जिल्हयामध्ये पोलीस अंमलदार या पदावर भरती झालेल्या नवप्रविष्ठ पोलीस अंमलदार यांचे एकुण ०७

बॅचेस प्रशिक्षित करण्यात आलेल्या आहेत. तसेच होमगार्ड शिपाई यांचे प्रशिक्षणाचे ०२ बॅचेस प्रशिक्षित करण्यात आलेल्या आहेत. तसेच  महाराष्ट्र पोलीस दलामध्ये सागरी बोटीवरील तांत्रिक पोलीस अंमलदार यांचे ०३ महिनेच्या मुलभूत प्रशिक्षणाची ०१ बॅच पुर्ण करण्यात आली असुन, महाराष्ट्र सुरक्षा दल ०१ बॅच व व्यावसायिक कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या PSU - I, II, III च्या पुरुष व महिला अंमलदार यांचे एकुण ०७ प्रशिक्षणाची सत्रे यशस्वीरित्या पार पाडण्यात आलेली आहे. वनविभागचे रेंज फॉरेस्ट ऑफीसर या पदांचे अधिकारीचे ०२ प्रशिक्षण सत्रे पार पाडण्यात आलेली आहे.

या व्यतिरिक्त पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची येथील परिसर हा पर्यावरणपुरक प्रकल्प म्हणून विकसित झाला असुन, या ठिकाणी श्रम प्रतिष्ठा व निसर्ग संवर्धन याबाबतीत विविध कामे  करण्यात आलेली आहेत. पोलीस प्रशिक्षणार्थी यांना मुलभूत प्रशिक्षणामध्ये सामजिक जबाबदारीबाबत सुदधा प्रशिक्षण दिले जाते. त्यानुसरुन पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये श्रमदानमधून वृक्ष रोपन व वृक्ष संवर्धन करणे, परिसर स्वच्छता करणे, प्लास्टिक वापरावर बंदी , पाणी बचत, गाव दत्तक योजनेतंर्गत ग्राम स्वच्छता अभियान पावसाचे पाणी साठवुन ठेवणेकरिता, पावसाचे पाणी जमीनीत जिरविणेकरिता, रेंन वॉटर हार्वेस्टींग असे विविध प्रकल्प कार्यन्वित केलेले आहेत. तसेच पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी यांच्या मनात सामजिक बांधिलकी ची भावना निर्माण करण्याकरिता जागोजागी स्वच्छता अभियान राबविणेकरिता झाडे लावा झाडे जगवा, सामजिक वनीकरण, निसर्ग वाचवा या प्रकराची प्रबोधनपर संदेश देणाऱ्या पोस्टर व भित्तीचित्रे लावण्यात आलेली आहे.

पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये जलसंधारण व मृदासंधारण  केले जाते. या ठिकाणी जलसंचयासाठी शेततळे तयार करण्यात आले असून १०,००० घन मीटर  एवढया पाण्याचे संकलन करता येते. आणि त्या पाण्याचा वापर वृक्ष संवर्धनसाठी तसेच प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रसाधनगृहाच्या साठी केला जातो.

तसेच प्रशिक्षण केंद्रामधील प्रशिक्षणार्थी व स्टाफ क्वार्टस यांचे कडील घन कचरा एकत्रित करुन, त्यावर कंपोस्ट खत निर्माण केले जाते. त्याचा वापर प्रशिक्षण केंद्रातील झाडाकरिता केला जातो. तसेच प्रशिक्षण केंद्रामध्ये सर्व सांडपाणी एकत्र गोळा करुन, एस.आय.बी.एफ.प्लांन्ट मार्फत त्याचे शुध्दीकरण करुन पोलीस प्रशिक्षण केंद्रामधील सर्व झाडांच्या सिंचनासाठी वापर करण्यात येतो. तसेच प्रशिक्षण केंद्रामध्ये विविध ठिकाणी एकूण ०९  बायोगॅस प्रकल्प कार्यान्वित  करण्यात आले असुन, त्यातून निर्मित बायोगॅस एकत्रित करुन त्याचा वापर प्रशिक्षण केंद्रातील मेस मध्ये करण्यात येतो. आणि त्यायोगे एलपीजी

सिलेंडर मोठया प्रमाणात बचत होत आहे. प्रशिक्षण केंद्रामधील हॉस्टेल इमारतीवरती सोलर वॉटर हिटर बसविण्यात आले आहेत. तसेच प्रशिक्षण केंद्रामध्ये ठिकठिकाणी सौर पथदिवे बसविणेत आले आहेत. पोलीस प्रशिक्षण केंद्रामधील प्रशिक्षणार्थी वसतीगृहावर पवन उर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे. सदरचे प्रकल्प पुर्ण क्षमतेने कार्यान्वित राहवे याकरिता योग्य मनुष्यबळाची नेमणूक करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे सामजिक जाणीव निर्माण करण्याकरिता पोलीस रेंझिंग डे च्या माध्यमातून विविध सामजिक उपक्रम राबविण्यात येत आहे त्यामध्ये दरवर्षी शाळेतील मुलांना प्रशिक्षण केंद्रात बोलावून, शास्त्राची ओळख व माहिती देणे आंतकवाद व नक्षलवाद याबाबतची माहिती देणे विविध गावांना भेटी देवून पोलीस व जनता यांचा समन्वय घडवून आणणे तसेच जन माणसात पोलीस दलाची प्रतिमा उंचविणेकरिता विविध उपक्रमांचे आयोजन करुन, त्यामध्ये जनतेस सहभागी करुन घेण्यात येते. तसेच गाव दत्तक योजना व गाव भेटी याद्वारे विविध गावामध्ये जावून देशप्रेम, वैयक्तिक व सामुहिक स्वच्छता व आरोग्य याबाबत जनजागृती करण्यात येते.

पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षणार्थी, प्रशिक्षक, अध्यापक व त्यांचे कुटुंबीय यांच्या करिता विविध सण समारंभ वेळी मेडिकल कॅम्प, रक्तदान शिबीर, दिवाळी पहाट असे कल्याणकरी उपक्रम राबविले जातात. तसेच सर्वाच्या मनोरंजनसाठी रिंडीग हब ऑडिओ लायब्ररी, नक्षत्र वन ओपन लायब्ररी, आनंदमन स्वास्थ केंद्र, तक्षशिला ग्रंथालय, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, बॅडमिटन हॉल व आधुनिक उपकरणांनी सुसज्ज जिम, योगा हॉल, व्ही.आय.पी. सुट सारख्या सोयीसुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

**२) अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये.**

पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची येथे प्रशिक्षणार्थी यांना देण्यात येणाऱ्या आंतरवर्ग अध्यापनासाठी पोलीस अधिकारी व विधी निदेशक अध्यापनाचे काम करीत आहेत. विधी निदेशक हे प्रामुख्याने कायदेविषयक अध्यापन करत असून पोलीस अधिकारी हे प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचे काम करीत आहेत.

महाराष्ट्र शासनाकडून पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची मध्ये प्रशिक्षणाकरीता मंजूर, हजर व रिक्त असलेली पदे खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पदनाम | मंजूर | हजर | रिक्त |
|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य | १ | १ | ० |
| २ | उपप्राचार्य /पोलीस उप अधीक्षक | २ | ० | २ |
| ३ | पोलीस निरीक्षक | ११ | ९ | २ |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | ५ | ५ | ० |
| ५ | पोलीस उपनिरीक्षक | ९ | ६ | ३ |
| ६ | राखीव पोलीस निरीक्षक | ५ | ५ | ० |
| ७ | राखीव पोलीस उपनिरीक्षक | ७ | ७ | ० |
| ८ | सहाय्यक पोलीस उप निरीक्षक | १५ | ४ | ११ |
| ९ | पोलीस हवालदार | २९ | ११ | १८ |
| १० | पोलीस हवालदार आयुधिक | १ | ० | १ |
| ११ | पोलीस नाईक | १७ | १५ | २ |
| १२ | चालक पोलीस नाईक | ४ | ३ | १ |
| १३ | पोलीस शिपाई | १९ | १९ | ० |
| १४ | आयुधिक पोलीस शिपाई | २ | ० | २ |
| १५ | चालक पोलीस शिपाई | ५ | ३ | २ |
| १६ | विधी निदेशक | ८ | १ | ७ |
| १७ | सहाय्यक लेखा अधिकारी | १ | ० | १ |
| १८ | कार्यालय अधीक्षक | १ | १ | ० |
| १९ | प्रमुख लिपीक | ३ | ३ | ० |
| २० | उच्चश्रेणी लघुलेखक | १ | ० | १ |
| २१ | निम्नश्रेणी लघुलेखक | १ | ० | १ |
| २२ | वरिष्ठ श्रेणी लिपीक | ५ | ५ | ० |
| २३ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ८ | ६ | २ |
| २४ | कार्यालयान शिपाई | ३ | ३ | ० |
| २५ | वैद्यकीय अधिकारी | १ | १ | ० |
| २६ | परिचारिका/परिचर | १ | ० | १ |
| २७ | मिश्रक | १ | १ | ० |
| २८ | वॉर्डबॉय (कक्षसेवक) | १ | ० | १ |
| २९ | व्रणोपचारक | १ | ० | १ |
| ३० | मुख्य स्वयंपाकी | ७ | २ | ५ |
| ३१ | सहाय्यक स्वयंपाकी | १३ | ५ | ८ |
| ३२ | भोजनालय सेवक | १६ | ० | १६ |
| ३३ | सफाईगार | १० | ७ | ३ |
| ३४ | माळी | ४ | ० | ४ |
| ३५ | मोची | ४ | ० | ४ |
| ३६ | शिंपी | ४ | ० | ४ |
| ३७ | न्हावी | ३ | ० | ३ |
| ३८ | धोबी | २ | १ | १ |
| | **एकूण** | **२३१** | **१२४** | **१०७** |

उपप्राचार्य हे पोलीस उपअधीक्षक दर्जाचे अधिकारी असुन, विषय शिक्षक म्हणून पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक हे अध्यापनाचे काम करतात. तसेच सत्र समन्वयक व पालकत्व अधिकारी म्हणून प्राचार्य यांनी आदेशित केलेप्रमाणे पोलीस निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी काम करित असतात. तसेच सर्व पोलीस अधिकारी प्राचार्य यांनी त्यांना प्रशिक्षण केंद्रातील नेमून दिलेल्या प्रशासकीय कामाचे समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) म्हणून काम पाहतात.

विधी अधिकारी यांना प्रशिक्षणार्थी यांचे वर्गावर तासिकेनुसार अध्यापन असते. याव्यतिरीक्त, विधी अधिकारी हे पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रकाशित करण्यात येणारी अभ्यासक्रमाची संदर्भ पुस्तके अद्ययावत करणे, पोलीस मॅन्युअल अद्ययावत करणे, न्यायनिवाड्याचे संदर्भ पुस्तक तयार करणे, कोर्टाचे न्यायनिवाडे बाबत मार्गदर्शन करणे हे काम करीत असतात. पीटीसी मॅट व न्यायालयीन कामकाज, संभाव्य प्रश्नपत्रिका, आदर्श उत्तरपत्रिका तयार करणे व उत्तरपत्रिका तपासणे, E- ACademy च्या मॉडयुलचे कामकाज तसेच सेवांतर्गत प्रशिक्षणाकरीता व्याख्याते म्हणून कामकाज करीत असतात.

**३) निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतील अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पयेवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली.**

पोलीस प्रशिक्षण केंद्र,तुरची तासगांव या कार्यालयाकडील कामकाजाची विभागणी खालीलप्रमाणे करण्यांत आली आहे.

**अ) प्राचार्य -** प्रशिक्षण केंद्रातील आंतरवर्ग व बाहयवर्ग प्रशिक्षणावर देखरेख करणे, अभ्यासक्रमाप्रमाणे प्रशिक्षक अध्यापन करतील याबाबतची खात्री करतील. प्रशिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय विषयांचे कामकाज. इत्यादी बाबीं हाताळल्या जातात.

**ब) उपप्राचार्य (प्रशासन) -** प्रशिक्षण केंद्रातील आंतरवर्ग प्रशिक्षणावर देखरेख करणे, अभ्यासक्रमाप्रमाणे प्रशिक्षक अध्यापन करतील याबाबतची खात्री करतील. प्रशिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय विषयांचे कामकाज. इत्यादी बाबीं हाताळल्या जातात.

**क) उपप्राचार्य (प्रशिक्षण) -** प्रशिक्षण केंद्रातील बाहयवर्ग प्रशिक्षणावर देखरेख करणे, अभ्यासक्रमाप्रमाणे प्रशिक्षक अध्यापन करतील याबाबतची खात्री करतील. इत्यादी बाबीं हाताळल्या जातात.

प्रशिक्षण संस्थेची प्रशिक्षण क्षमता म्हणजे कोणत्याही वेळी प्रशिक्षण संस्थेमध्ये एकापेक्षा अधिक अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण सत्र आणि त्यामधील एकापेक्षा अधिक दर्जाच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षित करणेची क्षमता आहे.

पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरचीची प्रशिक्षण क्षमता गणना करतांना प्रामुख्याने आंतरवर्ग क्षमता, बाह्यवर्ग क्षमता, उपलब्ध प्रशासकीय मनुष्यबळ, निवास व्यवस्था, भोजनगृह, पायाभूत सुविधा यांचा विचार करुन प्रशिक्षण क्षमतेची गणना केलेली आहे.

पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची मध्ये प्रशिक्षण कामकाजाकरीता खालीलप्रमाणे पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांची मंजूर पदे :-

१.प्राचार्य

२.उपप्राचार्य ( प्रशासन )
३.उपप्राचार्य ( प्रशिक्षण )

पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची मध्ये बाहयवर्गाकरिता राखीव पोलीस निरीक्षक, राखीव पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे अधिकारी आहेत. तसेच प्रशिक्षणार्थी यांना कवायती प्रशिक्षण व हत्यारी प्रशिक्षण इत्यादी करिताचे अनुषंगानिक प्रशिक्षण देण्याकरिता वरील अधिकाऱ्यांना कवायत निदेशक म्हणून पोलीस हवालदार, पोलीस नाईक, पोलीस शिपाई या दर्जाचे अंमलदाराचे नेमणूक करण्यात येते.

आंतरवर्ग प्रशिक्षणाकरिता पोलीस उपअधीक्षक, नि:शस्त्र पोलीस निरीक्षक, नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे अधिकारी आहेत.

प्रशिक्षणार्थी यांचे प्रशिक्षण दरम्यान परिसरात रोगराईचा प्रादुर्भाव होवू नये व नियमित पणे साफसफाई राहवी याकरिता योग्य ते सफाई कामगाराचे मनुष्यबळ शासकीय नेमणूकद्वारे तसेच गरजेनुसार कत्रांटी पध्दतीने करण्यात येते. सदर स्टाफला स्वच्छतेबाबत वेळोवेळी प्रशिक्षण ही देखील दिले जाते.

**४) स्वत:ची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडून ठरविण्यात आलेली मानके.**

पोलीस प्रशिक्षण केंद्रातील आंतरवर्ग व बाहयवर्ग यामधील प्रशिक्षणाचा दर्जा अत्यंत उत्तम आहे.

**५) त्याच्याकडे असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख.**

| अ.क्र. | सूचना पत्रकानुसार दिलेले विषय | नियम क्रमांक व वर्ष | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | पोलीस प्रशिक्षण केंद्राची स्थापना. | शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक टीईएक्स/०३०८/प्र.क्र.४४२/पोल-अ, दि.०४/०६/२०१०. | सदर शासन निर्णयानुसार प्रशिक्षण केंद्राची स्थापना झालेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | पोलीस प्रशिक्षण नियमावली. | २०१६ | प्रशिक्षण केंद्रातील कामकाज प्रशिक्षण नियमावलीनुसार चालते. |

**६) त्याच्याकडे असलेल्या किंवा नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण.**

| अ.क्र. | तपशील | जतन कालावधी |
|---|---|---|
| १ | केंद्र व राज्य शासनाचे शासन निर्णय | कायम स्वरुपी |
| २ | परिपत्रक नस्ती | कायम स्वरुपी |
| ३ | स्थायी आदेश नस्ती | कायम स्वरुपी |
| ४ | अधिसूचना नस्ती | कायम स्वरुपी |
| ५ | पोलीस महासंचालक याच्याकडील परिपत्रक नस्ती. | कायम स्वरुपी |
| ६ | राजपत्र नस्ती. | कायम स्वरुपी |

**७) आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनियम करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदन केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील.**

| अ.क्र. | सल्लामसल्लतीचा विषय | कार्यप्रणालींचे विस्तुत वर्णन | कोणत्या अधिनियम / नियम परिपत्रकान्वये | पुनरावृत्तीचा काल |
|---|---|---|---|---|
| १ | दत्तक गांव योजना | गांव दत्तक घेवून सदर ठिकाणी आरोग्य विषय, वाहतुक नियमांविषयी माहिती दिली. तसेच कोविड विषयी जनजागृती केली आहे. | -- | -- |
| २ | वृक्षारोपन | प्रशिक्षण केंद्र परिसरातील वेगवेगळया गांवी वृक्षारोपन केले. | -- | -- |
| ३ | वेपन माहिती | स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव या कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण केंद्र परिसरातील वेगवेगळया तालुक्यांना | महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग परिपत्रक क्रमांक संकीर्ण | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | भेट देवून माहिती दिली. | ८२२२/प्र.क्र.११० (भाग-२)/सां.का.४ दि.२०/७/२०२२ प्रमाणे. | |
| ४ | महिला अत्याचार याबाबतची जनजागृती. | प्रशिक्षण केंद्र परिसरातील वेगवेगळया शाळा कॉलेजमध्ये महिला अत्याचार याबाबतची जनजागृती केली. | -- | -- |

**८) आपल्या एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटित केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळांचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण, आणि त्या मंडळांच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण.**

| अ.क्र. | इमारतीचे नांव / कामाचे ठिकाणी | अधिकारी व अंमलदार यांचे नांव |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षण भवन इमारत माहिती व आंतरवर्ग प्रशिक्षणाबाबतची माहिती. | प्रभारी उपप्राचार्य, एस.बी.हारुगडे. |
| | | राखीव पो.उपनिरीक्षक, टी.बी.भोसले |
| | | |
| २ | संगणक शाखा, ॲम्बीस, ई-लर्निग व वेब साईड | सहापोनि/डी.के.पाटील |
| | | मसहापोनि/नंदा पाटील |
| | | मपोउनि/श्वेताली सुतार |
| | | पोउनि/अजित भोसले |
| | | |
| ३ | मॉडेल पोलीस ठाणे | पोउनि/विक्रांत संकपाळ |
| | | पोउनि/विक्रांत पाटील |
| | | |
| ४ | पोलीस दवाखाना | वैद्यकिय अधिकारी/ काळे |
| | | औषध निर्माण अधिकारी/ देशमुख |
| | | |
| ५ | मोटार परिवहन विभाग | रापोनि/एस.बी.गवई |
| | | चालक पोलीस हवालदार/जठार |
| | | |
| ६ | राखीव पोलीस निरीक्षक यांचे कार्यालय | रापोनि/एस.बी.गवई |
| | | पोह/बी.यु.माळी |
| | | पोशि/बी.डी.सांळूखे |

| | | |
|---|---|---|
| ७ | शस्त्रागार शाखा | रापोउपनिरीक्षक/आर.एस.मिसाळ |
| | | पोह/एस.एच.लोढे |
| ८ | गट भांडार | पोह/एस.टी.कोळी |
| | | |
| ९ | कॅडेट मेस | पोनि/एस.जी.मुलाणी |
| | | रापोउनि/बी.टी.लाड |
| | | पोना/एम.एस.भिसे |
| | | मपोशि/ए.व्ही.पाटील |
| | | |
| १० | वसतिगृह इमारत - ०१ | मपोनि/आर.बी.मुलाणी |
| | | रापोउनि/ए.एम.कंठीवार |
| | | |
| ११ | वसतिगृह इमारत - ०२ | मसपोनि/नंदा पाटील |
| | | रापोउपनि/आर.एस.मिसाळ |
| | | पोना/एम.बी.गुरव |
| | | |
| १२ | वसतिगृह इमारत - ०१ | मपोउनि/श्वेताली सुतार |
| | | रापोउपनि/सी.के.भोसले |
| | | पोना/एम.डी.भोसले |
| | | |
| १३ | रायगड रेस्ट हाऊस व अधिकारी निवासस्थान | रापोउपनि/सी.के.भोसले |
| | | पोना/एम.एम.भिसे |
| | | |
| १४ | शासकीय निवासस्थाने | रापोउपनि/सी.के.भोसले |
| | | पोशि/बी.डी.साळुंखे |
| | | |
| १५ | धोबी व टेलर | रापोउपनि/एम.एस.ठोंबरे |
| | | |
| १६ | एसआयबीएफ प्रकल्प | रापोउपनि/एम.एस.ठोंबरे |
| | | पोशि/आर.एस.शेख |
| | | |
| १७ | वाचनालय | पोनि/कुरळे |
| | | पोना/एम.एम.बाटे |
| १८ | जिमन्याशियम | रापोनि/व्ही.आर बावीस्कर |
| | | पोह/व्ही.व्ही.खेराडकर |
| | | पोना/एस.पी.भोसले |
| | | |
| १९ | ऑबस्टीकल्स | रापोनि/व्ही.आर बावीस्कर |
| | | पोशि/डी.आर.डांगे |
| | | पोशि/एस.टी.पाटील |
| | | |

| | | |
|---|---|---|
| २० | आतील रनिंग ट्रक | रापोनि/व्ही.आर बावीस्कर |
| | | |
| २१ | आनंदवन स्वास्थ केंद्र | रापोनि/ए.आर.वरेकर |
| | | पोशि/एम.एन.मकानदार |
| | | |
| २२ | रेन हार्वेस्टीग तलाव | रापोनि/ए.आर.वरेकर |
| | | पोशि/डी.आर.डांगे |
| | | |
| २३ | सिताफळ बाग | रापोनि/ए.आर.वरेकर |
| | | पोना/ए.एम.बाटे |
| | | पोशि/एस.टी.पाटील |
| | | |
| २४ | नक्षत्रवन | रापोनि/ए.आर.वरेकर |
| | | पोना/एस.पी.पाटील |
| | | |
| २५ | रिडींग हब | रापोउपनि/एम.एस.ठोंबरे |
| | | |
| २६ | मियावाकी गार्डन | रापोनि/ए.आर.वरेकर |
| | | पोशि/एस.टी.पाटील |
| | | |
| २७ | बाहयवर्ग प्रशिक्षणाबाबत माहिती देणे. | रापोनि/एस.एल.बारावकर |
| | | रापोनि/ए.आर.वरेकर |
| | | रापोनि/व्ही.आर.बावीस्कर |
| | | रापोनि/आर.टी.शिंदे |
| | | रापोउपनिरीक्षक/आर.एस.मिसाळ |
| | | रापोउपनिरीक्षक/सी.के.भोसले |
| | | रापोउपनिरीक्षक/टी.बी.भोसले |
| | | रापोउपनिरीक्षक/ए.एम.कंठीवार |
| | | रापोउपनिरीक्षक/ ए.आर.बावस्कर |
| | | रापोउपनिरीक्षक/ एम.एस.ठोंबरे |
| २८ | बहूउद्देशिय सभागृह (मल्टीपर्पज हॉल) | रापोउपनिरीक्षक/ ए.एम.कंठीवार |
| | | पोना/एम.डी.बनसोडे |
| | | |
| २९ | प्रोव्हीजल स्टोअर | रापोनि/आर.टी.शिंदे |
| | | सपोनि/पिसाळ |
| | | पोना/पोतदार |
| | | |
| ३० | वॉटर एटीएम | रापोनि/ए.आर.वरेकर |
| | | सपोनि/पिसाळ |
| | | पोना/खराडे |
| ३१ | महिला कक्ष | मपोनि/आर.बी.मुलाणी |

**९) आपल्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची निर्देशिका.**

| अ.क्र. | पदनाम | वर्ग |
|---|---|---|
| १ | प्राचार्य | १ |
| २ | उपप्राचार्य /पोलीस उप अधीक्षक | १ |
| ३ | पोलीस निरीक्षक | १ |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | २ |
| ५ | पोलीस उपनिरीक्षक | २ |
| ६ | राखीव पोलीस निरीक्षक | १ |
| ७ | राखीव पोलीस उपनिरीक्षक | २ |
| ८ | सहाय्यक पोलीस उप निरीक्षक | ३ |
| ९ | पोलीस हवालदार | ३ |
| १० | पोलीस हवालदार आयुधिक | ३ |
| ११ | पोलीस नाईक | ३ |
| १२ | चालक पोलीस नाईक | ३ |
| १३ | पोलीस शिपाई | ३ |
| १४ | आयुधिक पोलीस शिपाई | ३ |
| १५ | चालक पोलीस शिपाई | ३ |
| १६ | विधी निदेशक | २ |
| १७ | सहाय्यक लेखा अधिकारी | २ |
| १८ | कार्यालय अधीक्षक | २ |
| १९ | प्रमुख लिपीक | ३ |
| २० | उच्चश्रेणी लघुलेखक | ३ |
| २१ | निम्नश्रेणी लघुलेखक | ३ |
| २२ | वरिष्ठ श्रेणी लिपीक | ३ |
| २३ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ३ |
| २४ | कार्यालयान शिपाई | ४ |
| २५ | वैद्यकीय अधिकारी | १ |
| २६ | परिचारिका/परिचर | ३ |
| २७ | मिश्रक | ३ |
| २८ | वॉर्डबॉय (कक्षसेवक) | ४ |
| २९ | व्रणोपचारक | ४ |
| ३० | मुख्य स्वयंपाकी | ४ |
| ३१ | सहाय्यक स्वयंपाकी | ४ |
| ३२ | भोजनालय सेवक | ४ |
| ३३ | सफाईगार | ४ |
| ३४ | माळी | ४ |
| ३५ | मोची | ४ |
| ३६ | शिंपी | ४ |
| ३७ | न्हावी | ४ |
| ३८ | धोबी | ४ |

**१०) आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे मासिक वेतन तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्याची पध्दती.**

| अ.क्र | पदनाम (वर्ग) | वेतनश्रेणी | इतर अनुज्ञेय भत्ते. | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नियमित म. भत्ता / घरभाडे भत्ता / शहर भत्ता. | प्रसंगानुसार (जसे प्रवास भत्ता) | विशेष भत्ता. |
| १ | प्राचार्य (१) | एस-२३ १५६००-३९१०० | शासकीय निवासस्थानात राहत असलेल्याना अनुज्ञेय नाही. | - | - |
| २ | उपप्राचार्य (१) | एस-२० १५६००-३९१०० | बेसिक + महागाई भत्ता ३४ टक्के + घरभाडे ९ टक्के + इतर भत्ते | - | - |
| ३ | पोलीस निरीक्षक (१) | एस-१८ ९३००-३४८०० | | रु.१३५०/- प्रतिमहा | - |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक (२) | एस-१५ ९३००-३४८०० | | रु.१३५०/- प्रतिमहा | - |
| ५ | पोलीस उपनिरीक्षक (२) | एस-१४ ९३००-३४८०० | | रु.१३५०/- प्रतिमहा | - |
| ६ | सहा. पोलीस उपनिरीक्षक(३) | एस-१० ५२००-२०२०० | | रु.१३५०/- प्रतिमहा | - |
| ७ | पोलीस हवालदार (३) | एस-०९ ५२००-२०२०० | | रु.१३५०/- प्रतिमहा | - |
| ८ | पोलीस शिपाई (३) | एस-०७ ५२००-२०२०० | | रु.१३५०/- प्रतिमहा | - |
| ९ | विधी निदेशक (१) | एस-१६ ९३००-३४८०० | | रु.१३५०/- प्रतिमहा | - |
| १० | वैद्यकिय अधिकारी (१) | एस-२३ १५६००-३९१०० | | -- | - |
| ११ | मिश्रक (१) | एस-१० ५२००-२०२०० | | रु.१३५०/- प्रतिमहा | - |
| १२ | सहाय्यक लेखा अधिकारी (२) | एस-१५ ९३००-३४८०० | | रु.१३५०/- प्रतिमहा | - |
| १३ | कार्यालय अधीक्षक (२) | एस-१४ ९३००-३४८०० | | रु.१३५०/- प्रतिमहा | - |
| १४ | प्रमुख लिपिक (३) | एस-१३ ९३००-३४८०० | | रु.१३५०/- प्रतिमहा | - |
| १५ | वरिष्ठ श्रेणी लिपिक (३) | एस-०८ ५२००-२०२०० | | रु.१३५०/- प्रतिमहा | - |
| १६ | कनिष्ठ श्रेणी लिपिक (३) | एस-०६ ५२००-२०२०० | | रु.६५०/- प्रतिमहा | - |
| १७ | कार्यालयीन शिपाई / सफाईगार (४) | एस-०३ ४४४०-७४४० | | रु.६५०/- प्रतिमहा | - |
| १८ | मुख्य स्वयंपाकी (४) | एस-०५ ५२००-२०२०० | | रु.६५०/- प्रतिमहा | - |
| १९ | सहाय्यक स्वयंपाकी (४) | एस-०३ ४४४०-७४४० | | रु.६५०/- प्रतिमहा | - |
| २० | भोजनसेवक | एस-०१ | | रु.६५०/- प्रतिमहा | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ४४४०-७४४० | | | |
| २१ | धोबी | एस-०३<br>४४४०-७४४० | | रु.६५०/- प्रतिमहा | - |

**११) सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरित केलेल्या रकमांचा अहवाल.**

**सन २०२२-२३ करिता मंजूर अनुदानाची माहिती.**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मंजूर अनुदान |
|---|---|---|
| १ | वेतन -०१ | १,५०,२९,०१०/- |
| २ | बक्षीसे - ०५ | ४१,०००/- |
| ३ | दूरध्वनी, वीज आणि पाणी - ०६ | ४,२८,०००/- |
| ४ | कंत्राटी सेवा - १० | १,८४,०००/- |
| ५ | प्रवास खर्च - ११ | ९५,६७७/- |
| ६ | कार्यालयीन खर्च - १३ | ४,७९,४५२/- |
| ७ | संगणक खर्च - १८ | ४५,९२८/- |
| ८ | साप्ताहीक सुट्टी देयक -१८ | २०,७४८/- |
| ९ | पेट्रोल, ऑईल व वंगण - २४ | १,६४,०४०/- |
| १० | व्यवसायिक विशेष सेवा - २८ | ३५,०००/- |
| ११ | इतर खर्च - ५० | ९३,०००/- |
| १२ | मोटार वाहन - ५१ | ३७,०००/- |

**१२) अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिकाऱ्यांचा तपशील.**

**लागू नाही.**

**१३) ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील.**

**लागू नाही.**

**१४) इलेक्ट्रॉनिक स्वरुपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील.**

| अ.क्र. | दस्तऐवजाचा प्रकार | विषय | कोणत्या इलेक्ट्रॉनिक नमुन्यात | माहिती मिळवण्याची पध्दती |
|---|---|---|---|---|
| १ | संगणकीकृत (Hard Copy) | प्रशिक्षण केंद्रातील वाचनालयातील पुस्तकांची यादी | Hard Disk | CD / USB Drive |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | संगणकीकृत (Hard Copy) | प्रशिक्षण केंद्रातील नेमणूकीस असलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांची यादी. | Hard Disk | CD / USB Drive |

**१५) माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील.**

- **बेबसाईट :-** **www.ptcturchi.com**
- **कॉल सेंटर :- अस्तिवात नाही.**
- **अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध सुविधा :-** कार्यालयीन अभिलेख्याचे संबंधीत वरिष्ठांकडून अभिलेख तपासण्याची कार्यपध्दती प्रचलित आहे. मात्र पोलीस खात्यासारख्या सरंक्षरणाशी निगडीत असलेलया गोपनीयतेची बाब लक्षात घेऊनच पुढील कार्यवाही करण्यांत येते.
- **नमुने मिळण्याबाबत उपलब्ध माहिती :-** गोपनीय नसलेले नमुने जनता संबंधीत माहिती अधिकाऱ्यांकडून उपलब्ध करुन घेवू शकते.
- **ग्रंथालयाविषयी माहिती :-** जनतेसाठी हया कार्यालयातील ग्रंथालय कार्यरत नाही.

**१६) जन माहिती अधिकाऱ्यांची नावे, पदनामे आणि इतर तपशील.**

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | प्रथम अपिलीय अधिकारी | श्री.धीरज पाटील,<br>प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र,तुरची-तासगांव. |
| २ | जनमाहिती अधिकारी | श्री.अविनाश सावळा पवार,<br>कार्यालय अधीक्षक, पोलीस प्रशिक्षण केंद्र,तुरची तासगांव. |

**१७) विहीत करण्यात येईल अशी इतर माहिती.**

पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षणार्थी, प्रशिक्षक, अध्यापक व त्यांचे कुटुंबीय यांच्या करिता विविध सण समारंभ वेळी मेडिकल कॅम्प, रक्तदान शिबीर, दिवाळी पहाट असे कल्याणकरी उपक्रम राबविले जातात. तसेच सर्वाच्या मनोरंजनसाठी रिंडीग हब ऑडिओ लायब्ररी, नक्षत्र वन ओपन लायब्ररी,

आनंदमन स्वास्थ केंद्र, तक्षशिला ग्रंथालय, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, बॅडमिटन हॉल व आधुनिक उपकरणांनी सुसज्ज जिम, योगा हॉल, व्ही.आय.पी. सुट सारख्या सोयीसुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

**प्रशासकीय इमारत**



पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची येथे प्रशासकीय इमारतीमध्ये प्राचार्य यांचे व उपप्राचार्य ( प्रशासन ) यांचे दालने आहेत. तसेच याच इमारतीमध्ये मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यालय कक्ष आहे. सत्र समन्वयक व आंतरवर्ग अधिकारी यांचे करिता स्टाफ रुम म्हणून सुसज्ज मोठा हॉल व ओपन लायब्ररी आहे. तसेच प्रशासकीय इमारतीचे वरच्या मजल्यावर सुसज्ज काम्पुटर लॅब आहेत. व त्यालगतच प्रशिक्षणार्थीना क्लास रुम आहेत.

## आंतरवर्ग अभ्यासक्रम

सद्यस्थितीत पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची येथे चालू असलेल्या प्रशिक्षणार्थी नवप्रविष्ठ पोलीसअंमलदार यांचा आंतरवर्ग अभ्यासक्रम खालीलप्रमाणे :-

| पेपर क्र | विषयाचे नाव | गुण |
|---|---|---|
| **०१** | फौजदारी कायदा ०१ | **१००** |
| **०२** | फौजदारी कायदा ०२ | **१००** |
| **०३** | केंद्र व राज्याचे लघुकायदे | **१००** |
| **०४** | गुन्हेनियंत्रण व पोलीस कार्यपध्दती | **१००** |
| **०५** | कायदा व सुव्यवस्था | **१००** |
| **०६** | पोलीस संघटन, प्रशासन व शासकीय विभाग | **१००** |

| | | |
|---|---|---|
| **०७** | पोलीस कामकाजातील विज्ञान व तंत्रज्ञान | **१००** |
| **०८** | प्रात्यक्षिके | **१००** |
| **०९** | भावनिक प्रज्ञावंत पोलीस | **१००** |

वरील विषयांची लेखी अंतिम परिक्षा घेवुन प्रशिक्षणार्थीने प्राप्त केलेले गुण आणि बाहयवर्गात मिळविलेले गुण यांचे एकत्रित मुल्यमापन केले जाते. तसेच भावनिक प्रज्ञावंत या विषयास ग्रेडेशन पध्दतीने मुल्यमापन केले जाते.

**प्रशिक्षण वर्ग व्यवस्था**

पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची येथे आंतरवर्ग प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षण भवन येथे १० क्लासरुम, तसेच होस्टेल क्रमांक ०३ येथे ०६ विस्तारित क्लासरुम व बहुउद्देशीय सभागृह हे गेस्ट लेक्चर करिता उपलब्ध आहेत.

**प्रशिक्षण वर्ग व प्रशिक्षणार्थी क्षमता.**

| **अ.क्र** | **नाव** | **वर्गाच्या आकार मानच्या मानकानुसार बैठक क्षमता (अंदाजे)** |
|---|---|---|
| **१** | प्रशिक्षण भवन वर्ग क्रमांक ०१ | **५०** |
| **२** | प्रशिक्षण भवन वर्ग क्रमांक ०१ | **५०** |
| **३** | प्रशिक्षण भवन वर्ग क्रमांक ०१ | **५०** |
| **४** | प्रशिक्षण भवन वर्ग क्रमांक ०१ | **५०** |
| **५** | प्रशिक्षण भवन वर्ग क्रमांक ०१ | **५०** |
| **६** | प्रशिक्षण भवन वर्ग क्रमांक ०१ | **५०** |
| **७** | प्रशिक्षण भवन वर्ग क्रमांक ०१ | **५०** |
| **८** | प्रशिक्षण भवन वर्ग क्रमांक ०१ | **५०** |
| **९** | प्रशिक्षण भवन वर्ग क्रमांक ०१ | **५०** |
| **१०** | प्रशिक्षण भवन वर्ग क्रमांक ०१ | **५०** |
| **विस्तारित प्रशिक्षण वर्ग** | | |
| **११** | होस्टेल क्रमांक ०३ वर्ग क्र. ०१ | **२५** |
| **१२** | होस्टेल क्रमांक ०३ वर्ग क्र. ०२ | **२५** |
| **१३** | होस्टेल क्रमांक ०३ वर्ग क्र. ०३ | **२५** |
| **१४** | होस्टेल क्रमांक ०३ वर्ग क्र. ०४ | **२५** |
| **१५** | होस्टेल क्रमांक ०३ वर्ग क्र. ०५ | **२५** |
| **१६** | होस्टेल क्रमांक ०३ वर्ग क्र. ०६ | **२५** |
| | **एकुण प्रशिक्षणार्थी बैठक व्यवस्था** | **६५०** |





पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची येथे सद्यस्थितीमध्ये एकूण **१६** वर्ग उपलब्ध आहेत. वरील नमूद वर्गामध्ये बैठक व्यवस्थेसाठी खुर्च्या तसेच श्राव्यकासाठी माईक, स्पीकर व प्रोजेक्टर उपलब्ध आहेत. पुरुष व महिला प्रशिक्षणार्थीसाठी स्वतंत्रपणे प्रशिक्षण सत्रे घेतली जात असल्यामुळे प्रशिक्षणार्थी करिता पर्याप्त प्रसाधनगृह उपलब्ध आहेत.

**कॉम्प्युटर लॅब**

पोलीस प्रशिक्षण केंद्र,तुरची या ठिकाणी प्रशिक्षण भवन येथे सुसज्ज अशी कॉम्प्युटर लॅब असुन, त्यामध्ये इंटरनेट कनेक्टव्हीटी, प्रोजेक्टर, या सारख्या सुविधा पुरविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये साधारणत ०१ स्कॉड प्रमाणे २५ प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेवू शकतात.



**AMBIS**

प्रशिक्षणार्थी AMBIS अंगुलीमुद्रा कक्ष, मॉडेल पोलीस स्टेशन, तक्षशिला ग्रंथालय वाचनालय उपलब्ध आहेत.










**<u>बहुउद्देशीय हॉल</u>**

प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षणार्थींकरीता संगणक कक्ष, अभ्यासिका कक्ष, वाचनालय, बहुउद्देशीय हॉल उपलब्ध आहेत. तसेच, एकत्रित आंतरवर्ग प्रशिक्षणाकरीता खुले सभागृह (बहुउद्देशीय हॉल) असून त्या ठिकाणी **१००० ते १२००** प्रशिक्षणार्थींची बैठक व्यवस्था आहे. बहुउद्देशीय हॉल येथे वरिष्ठ अधिकारी आणि विषय तज्ज्ञ यांचे प्रशिक्षण केंद्राकडील सर्व प्रशिक्षणार्थी आणि अधिकारी यांचेकरीता व्याख्यान आयोजित केले जाते.तसेच पोलीस कल्याणकारी उपक्रमातंर्गत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.

**<u>बहुउद्देशीय हॉल</u>**






सदर बहुउद्देशीय हॉलमध्ये प्रोजेक्टर व स्क्रिनची व्यवस्था असुन, व्याख्यात्याकडून पीपीटी च्या सहायाने

प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण देण्याची सुविधा उपलब्ध आहे

**आंतरवर्ग प्रशिक्षण वेळापत्रक**

आंतरवर्ग प्रशिक्षण हे सोमवार ते शनिवार सकाळी **०९.००** ते **१३.४५** पावेतो असून प्रत्येकी **४५**मिनिटांच्या **०६** तासिकांमध्ये चालते.



**आंतरवर्ग अभ्यासक्रम**

सद्यस्थितीत पोलीस प्रशिक्षण केंद्र, तुरची येथे चालू असलेल्या प्रशिक्षणार्थी नवप्रविष्ठ पोलीसअंमलदार यांचा आंतरवर्ग अभ्यासक्रम खालीलप्रमाणे :-

| पेपर क्र | विषयाचे नाव | गुण |
|---|---|---|
| **०१** | फौजदारी कायदा ०१ | **१००** |
| **०२** | फौजदारी कायदा ०२ | **१००** |
| **०३** | केंद्र व राज्याचे लघुकायदे | **१००** |
| **०४** | गुन्हेनियंत्रण व पोलीस कार्यपध्दती | **१००** |
| **०५** | कायदा व सुव्यवस्था | **१००** |
| **०६** | पोलीस संघटन, प्रशासन व शासकीय विभाग | **१००** |
| **०७** | पोलीस कामकाजातील विज्ञान व तंत्रज्ञान | **१००** |
| **०८** | प्रात्यक्षिके | **१००** |
| **०९** | भावनिक प्रज्ञावंत पोलीस | **१००** |

वरील विषयांची लेखी अंतिम परिक्षा घेवुन प्रशिक्षणार्थीने प्राप्त केलेले गुण आणि बाहयवर्गात मिळविलेले गुण यांचे एकत्रित मुल्यमापन केले जाते. तसेच भावनिक प्रज्ञावंत या विषयास ग्रेडेशन पध्दतीने मुल्यामापन केले जाते.

## बाहयवर्ग प्रशिक्षण

पोलीस प्रशिक्षण केंद्र तुरची तासगाव येथे नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांचे मुलभूत प्रशिक्षण दिले जाते. नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांची एकुण ५८० गुणाची बाहयवर्ग परीक्षा घेण्यात येते. सदर परिक्षेमध्ये पास होण्याकरीता ५०% गुण प्राप्त करणे आवश्यक आहेत. त्यांना मुलभूत प्रशिक्षणादरम्यान बाहयवर्गामध्ये विविध प्रकारचे शारिरीक प्रशिक्षण देण्यात येते.

**बाहयवर्ग प्रशिक्षण वेळापत्रक**

बाहयवर्ग प्रशिक्षण हे सोमवार ते शनिवार ०६:०० वा. ते ८:२० वा. पर्यंत असुन १५:३० वा. ते १७:५० वा.पर्यंत चालते.

**बाहयवर्ग प्रशिक्षण मंजूर संख्याबळ**

| अक्र | पदनाम | मंजूर | हजर | रिक्त पदे | ज्यादा पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राखीव पोलीस निरीक्षक | **०५** | **०५** | **००** | **००** | **०५** |
| २ | राखीव पोलीस उपनिरीक्षक | **०७** | **०७** | **००** | **००** | **०७** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | सहा.पोलीस उप निरीक्षक (कवायत निदेशक) | १५ | ०४ | ११ | ०० | ०४ |
| ४ | पोलीस हवालदार (कवायत निदेशक) | २९ | ०८ | २१ | ०० | ०८ |
| ५ | पोलीस नाईक (कवायत निदेशक) | १७ | २० | ०० | ०३ | २३ |
| ६ | पोलीस शिपाई (कवायत निदेशक) | १९ | १९ | ०० | ०० | १९ |
| **एकूण** | | ९२ | ६३ | ३३ | ०३ | ६६ |

**मुख्य कवायत मैदान**






**बाहयवर्ग प्रशिक्षण अभ्यासक्रम**

पोलीस प्रशिक्षण केंद्र तुरची बाहयवर्ग प्रशिक्षण अभ्यासक्रम खालीलप्रमाणे :-

| अक्र | विषय | अक्र | विषय |
|---|---|---|---|
| १ | पी.टी, बी.पी.इ.टी., पी.पी.इ.टी, रोड रन आणि चालणे | १२ | कमांडो प्रशिक्षण |
| २ | ऑब्स्टॅकल कोर्स | १३ | आपत्ती व्यवस्थापन |
| ३ | ड्रिल | १४ | कराटे |
| ४ | वेपन प्रशिक्षण | १५ | प्रथोमपचार |
| ५ | मॅप रिडींग | १६ | सेरेमोनियल ड्रिल |
| ६ | लाठी कवायत | १७ | योगा |
| ७ | हातकडी बागडोर | १८ | ड्रायव्हिंग |
| ८ | अनार्म कॉम्बट | १९ | फिल्ड क्राफ्ट आणि टॅक्टीस |
| ९ | गोळीबार सराव | २० | स्फोटके |
| १० | जमाव विसर्जन | २१ | खेळ |
| ११ | रोड बंदोबस्त | २२ | पासिंग आऊट परेड |

**योगा**



**ऑब्स्टॅकल**





 

**<u>बाहयवर्ग प्रशिक्षणाकरीता उपलब्ध मैदान क्षमता</u>**

पोलीस प्रशिक्षण केंद्र तुरची येथे बाहयवर्ग प्रशिक्षणाकरीता मुख्य कवायत मैदान, फुटबॉल मैदान अशी एकुण ०२ मैदान वापरण्यात येतात. तसेच ऑब्स्टॅकल व कमांडो ट्रेनिंग करीता स्वंतत्र ट्रॅक उपलब्ध आहे.

BPR&D च्या मानकानुसार आवश्यक बाहयवर्ग प्रशिक्षणाकरीता प्रति स्कॉड जागेची आवश्यकता २५मी **X** २५मी आहे.

बाहयवर्ग प्रशिक्षणाकरीता मैदानाच्या एकुण क्षेत्रफळामध्ये ७०% क्षेत्रफळाचा प्रशिक्षणाकरीता वापर होतो. उर्वरीत क्षेत्रफळामध्ये अडथळा, किल्ला, मंचचा समावेश असल्याने त्या जागेचा वापर होत नाही.

**बाहयवर्ग प्रशिक्षणाकरीता मैदानांची क्षमता**

| **अक्र** | **मैदानाचे नाव** | **मैदानाचे मोजमाप (मीटर)** | **मैदानाचे एकुण क्षेत्रफळ (चौ.मी.)** | **बाहयवर्ग प्रशिक्षणाकरीता उपलब्ध मैदानाचे क्षेत्रफळ (चौ.मी.) (कॉलम ०४च्या ७०%)** | **स्कॉड संख्या** | **प्रशिक्षणार्थी संख्या ( कॉलम ०६ * २४ )** |
|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **७** |
| १ | मुख्य कवायत मैदान | १२० x १०० | १२००० | ८४०० | १३ | ३१२ |
| २ | फुटबॉल कवायत मैदान | १६० x १०६ | १६९६० | ११८७२ | १८ | ४३२ |
| | **एकुण** | | | २०२७७ | ३१ | ७५१ |

वरील बाहयवर्ग प्रशिक्षणाच्या क्षमता गणणाचे अवलोकन केले असतात पोलीस प्रशिक्षण केंद्र तुरची येथे उपलब्ध मैदानात एकुण अंदाजे ३१ स्कॉड मधील ७५१ प्रशिक्षणार्थींचे बाहयवर्ग प्रशिक्षण परिणामकारकरित्या देता येते.








**मुख्य कवायत मैदान, फुटबॉल ग्राउंड, ऑब्स्टॅकल, प्रशिक्षण भवन**



